इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

कार्यक्रम पत्रिका क्र. (६/२०२६)

सर्वसाधारण सभा

प्रति, दि. १०/०७/२०२६

मा. ----------------------------------------------------------------

नगरसेवक / नगरसेविका,

इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

महोदय,

इचलकरंजी महानगरपालिकेच्या मा. सदस्य यांना नोटीस देणेत येते की इचलकरंजी महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सोमवार दि. २०/०७/२०२६ रोजी दुपारी १२:१५ वाजता इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे भरविणेत येत आहे.

तरी सदर सभेस उपस्थित राहणेबद्दल आपणास विनंती करणेत येत आहे.

परिशिष्ठ

विषय क्र. ०१ : इचलकरंजी महानगरपालिका मालकीच्या व्यापारी गाळयांची २ ते ३ वेळा निविदा काढुनही भाड्याने न गेलेल्या महानगरपालिकेच्या व्यापारी गालयांचे भाडे दर कमी करुन फेर - निविदा काढणेबाबत मा. उपमहापौर, अनिल देवकरण डाळया यांनी दि. २१/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केले कामी कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ०२ : कार्यकारी संपादक दैनिक महासत्ता, इचलकरंजी यांनी महासत्ता चौक नियमानुसार सुशोभिकरण करणेस इच्छुक असलेने तसेच यापुर्वी इचलकरंजी नगरपालिका मा. कौन्सिल ठरावानुसार मंजुरी मिळालेली असलेने महासत्ता चौक सुशोभित करणेस कायम स्वरुपी मंजुरी मिळणेबाबत दि. ०८/०४/२०२६ चे पत्रानुसार विनंती केली आहे. तसेच अध्यक्ष, आम आदमी पार्टी, इचलकरंजी यांनी भारतीय संविधानाच्या आदर्शांना आणि मुल्यांना सलाम करणेसाठी महासत्ता चौक येथे संविधान चौक तयार करणेची दि. २०/०४/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेली आहे. याचबरोबर अविनाश गुलचंद कांबळे, नगरसेवक इ. म. पा. यांनी महासत्ता चौक येथे भारताची राजमुद्रा अशोकस्तंभ याची प्रतिकृती उभारुन सुशोभिकरण करणेची दि. २९/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केले बाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ०३ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दितील स्मशानभूमीत मृतदेहांच्या होणाऱ्या दहन विधीनंतर शिल्लक राहणाऱ्या अस्थी / राख नदी पात्रात विसर्जीत न करता सदर अस्थी / राख यांचे वैज्ञानिक पद्धतीने वृक्ष संवर्धनासाठी खत म्हणुन वापर करणेसाठी सदरची अस्थी / राख जनस्वातंत्र्य फाउंडेशन यांनी संस्थेला उपलब्ध करुन देणेची मागणी दि. ०५/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केले कामी कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ०४ : इचलकरंजी महानगरपालिका भगतसिंग उद्यान व राणी बाग येथे नाममात्र प्रवेश फी शुल्क व इतर शुल्क आकारणी करुन सदर उपलब्ध होणारा निधी त्याच ठिकाणी नागरीकांना समाधानकारक सुविधा निर्माण करणेसाठी खर्च करणेबाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. ०५ : रमाई आवास योजनेअंतर्गत साईट नं. १०२ येथील ९६ घरकुले लाभार्थी यांना वाटप करणेत आली असुन उर्वरीत घरे पुर्ण करणेबाबत मक्तेदार अभियंता यांची चौकशी करणेबाबत मा. महासभेमध्ये निर्णय होणेकामी अविनाश गुलचंद कांबळे, नगरसेवक यांनी दि. १४/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ०६ : भगतसिंग उद्यानाचे ईशान्य कोपऱ्यात खाऊ गल्ली करणेबाबत श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी दि. २९/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केले कामी दि. २५/०६/२०२६ चे सभेमध्ये पुढील मिटींग समोर ठेवणेबाबत झालेल्या निर्णयाचा विचार करणे.

विषय क्र. ०७ : मा. महापौर यांचे परवानगीने घेणेत येणारे ऐनवेळचे इतर विषय.

---

मा. महापौर, इचलकरंजी महानगरपालिका यांचे
दि. १०/०७/२०२६ चे आदेशानुसार.

(राहुल बा. पोटे)
प्र.नगरसचिव
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

# इचलकरंजी महानगरपालिका
## नोटीस
## सभा क्रमाक : ६

इचलकरंजी महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सोमवार दि. २०.०७.२०२६ रोजी दुपारी १२.१५ वा. इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात बोलाविणेत आलेली आहे. सदरची कार्यपत्रिका दि. १०/०७/२०२६ रोजी प्रसिध्द करणेत आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड मधिल प्रकरण २ मधील १ मध्ये असलेल्या तरतूदीस अनुसरुन खालीलप्रमाणे कामांची पुरवणी यादी सभेपुढे विचारार्थ ठेवणेत येत आहे.

## पुरवणी कार्यक्रम पत्रिका

विषय क्र. ०१ : इचलकरंजी शहर नळ पाणीपुरवठा योजना (कृष्णा नदी राधाकृष्ण मंदीर जुने दानवाड उदभव ) करीता पाणीपुरवठा योजनेची आखणी करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करणे व योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन मा. शासनास सादर करणेबाबत कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ०२ : माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या बक्षीस रक्कमेतुन पर्यावरणपुरक विकास कामांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ०३ : इचलकरंजी शहरातील महिला व युवतींसाठी विविध सार्वजनिक ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन बसविणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. १९ दि. १५/०६/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ०४ : इचलकरंजी शहरामध्ये विविध ठिकाणी अंगणवाडी इमारती बांधकाम करणेबाबत मा.सदस्य यांनी दिले पत्राबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. २० दि. १५/०६/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ०५ : इचलकरंजी महानगरपलिका क्षेत्रातील महिला व युवतींसाठी अत्याधुनिक स्वच्छतागृह व हिरकणी कक्ष उभारणी बाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. २१ दि. १५/०६/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस..

विषय क्र. ०६ : इचलकरंजी शहरातील अंगणवाडी विद्यार्थ्यांकरीता बौद्धिक विकास किट (IntellectualDevelopment Kit) मॉडेल पुरविणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. २२ दि. १५/०६/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ०७ : इचलकरंजी शहरातील विविध उद्यानात खेळणी व ओपन जिम साहित्या बसविणे बाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. २३ दि. १५/०६/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

विषय क्र. ०८ : जवाहर नगर भागातील पोष्ट ऑफीसला लागुन असलेल्या महानगरपालिकेच्या खोल्यांमध्ये अभ्यासिका / वाचनालय सुरु करणेबाबत मा. सतिश वसंतराव मुळीक, सभापती, स्थायी समिती यांनी व महानगरपालिकेच्या प्रत्येक झोन मध्ये नवीन वाचनालय सुरु करणेबाबत मा. प्रदीप नामदेव धुत्रे, सदस्य यांनी मागणी केलेकामी कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

विषय क्र. ०९ : आसरा नगर साईट नं. १०२ येथे रमाई आवास योजना घरकुलांना विद्युत व्यवस्था करुन देणेबाबत मा. उदयसिंग मारुती पाटील, विरोधीपक्षनेता यांनी मागणी केलेबाबत.

विषय क्र. १० : राजर्षी छत्रपती शाहु महाराज पुतळा चौकामध्ये असणारे पी. एम. श्री. एम. एस. बी. उर्दु प्राथमिक शाळा क्र. ४६ इमारतीच्या पुर्व बाजुस असणारी शौचालय इमारत जीर्ण झाली असलेने सदरची शौचालय इमारत निर्लेखीत करणेबाबत मा. विद्या मनोज साळुंखे, सभापती, शिक्षण समिती यांनी मागणी केलेबाबत कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. ११ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दितील चिकन, मटन, मासे विक्री व्यवसाय करणाऱ्यांना देणेत येणाऱ्या व्यवसाय परवाना व आरोग्य विषयक परवाना फी मध्ये वाढ करणेबाबत व नेहरु नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, साईट नं. १०२ व रेणुका नगर या ठिकाणी मटन / चिकन दुकाणे आढळुन येत असुन या ठिकाणी महापालिकेकडुन विक्रेत्यांना परवाना देणेत आलेला नाही. सदर ठिकाणी परवाना दयावयाचा झालेस मा. महासभेमध्ये निर्णय होणेबाबत कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

विषय क्र. १२ : ऑल इंडीया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट या संस्थेच्या नियामक मंडळ निवडणुकीसाठी निर्वाचन गण गठीत करणेकरीता महानगरपालिकेमध्ये निवडुन आलेल्या दोन विद्यमान प्रतिनिधींची नावे पाठविणेबाबत कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

---

मा. महापौर, इचलकरंजी महानगरपालिका यांचे
दि. १४/०७/२०२६ चे आदेशानुसार.

( राहुल बा. पोटे )
प्र.नगरसचिव
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९५४
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. ०१ : इचलकरंजी महानगरपालिका मालकीच्या व्यापारी गाळयांची २ ते ३ वेळा निविदा काढुनही भाड्याने न गेलेल्या महानगरपालिकेच्या व्यापारी गाळ्यांचे भाडे दर कमी करुन फेर - निविदा काढणेबाबत मा. उपमहापौर, अनिल देवकरण डाळया यांनी दि. २१/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केले कामी कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेच्या मालकीचे अनेक व्यापारी गाळे शहरात आहेत. त्यापैकी काही गाळ्यांसाठी महापालिकेने मागील जुलै २०२५पासून २ ते ३ वेळा निविदा प्रक्रिया राबवली. परंतु सध्याच्या भाडेदरामुळे सदर गाळ्यांना एकही निविदा प्राप्त झाली नाही व ते गाळे आजही रिकामे आहेत. महापालिकेचे आर्थिक हित लक्षात घेऊन केवळ ज्या गाळ्यांसाठी २ / ३ वेळा निविदा काढूनही प्रतिसाद मिळाला नाही, अशाच गाळ्यांचे मासिक भाडे कमी करून तातडीने फेर-निविदा काढावी असे मा. उपमहापौर श्री. अनिल डाळयासो यांनी विनंती केली आहे. इचलकरंजी महानगरपालिका मालकीच्या विविध १८ ठिकाणीच्या व्यापारी संकुलातील रिकामे गाळे भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समितीने निश्चित केलेल्या भाडे व सुरक्षा ठेव रक्कमेवर वेळोवेळी ई निविदा मागविणेत आले होत्या.

दि. २१ जुलै २०२५ रोजी एकूण १४८ रिकामे गाळेपैकी २३ गाळ्यांसाठी ई निविदा प्राप्त झाल्या आहेत. तसेच दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी एकूण १५४ रिकामे गाळेपैकी ३३ गाळ्यांसाठी ई निविदा प्राप्त झाल्या आहेत. तसेच जुलै २०२५ चे ई निविदा प्रक्रियेनंतर बंद अवस्थेतील गाळे निदर्शनास आलेने, इ.म.न.पा. ने सिल केलेले गाळे, म.न.पा.चे ताब्यात दिलेले गाळे, बंद अवस्थेतील गाळे इ. कारणामुळे डिसे. २०२५ चे ई निविदा प्रक्रियेमध्ये रिकामे असणारे गाळे यांची संख्या वाढलेली दिसून येते.

रिकामे गाळे संख्या व ई निविदा प्राप्त गाळ्याची संख्या याचा तौलनिक विचार करता ई निविदेस अत्यल्प प्रतिसाद मिळाला आहे. या व्यापारी संकुलाबाबत गाळेधारक व गाळे घेणेसाठी इकडे संपर्क केलेले व्यावसायिक / नागरिक यांनी भाडे व सुरक्षा ठेव जादा असलेने शिवाय महानगरपालिका घरफाळा व जी.एस.टी ची आकारणी भरावी लागत असलेने खाजगी गाळेपेक्षा भाडे जादा होत असलेने कमी करावे अशी विनंती करीत आहेत.

या बाबत भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समितीची दि. २२/०४/२०२६ बैठक झाली सदर बैठकीत गाळेचे भाडे कमी करणे मागणीबाबत सविस्तर चर्चा झाली. सदर रिकामे गाळ्याचा परत ई निविदा मागविणेत याव्यात. ई निविदेस प्रतिसाद पाहून भाडे कमी करणे मागणीबाबत निर्णय घेणेत येईल असे ठरले.

एकूण १८ इमारतीपैकी एकूण १२३ रिकामे दुकान गाळे पैकी दि. ८/५/२०२६ ते दि. २२/५/२०२६ या कालावधीमध्ये सद्या रिकामे गाळे संख्या ५७ यांची ई निविदा प्रसिद्ध करणेत आली होती. त्यापैकी फक्त १२ दुकान गाळ्यांना प्रतिसाद मिळाला आहे. व शिल्लक गाळे यांची संख्या १११ राहत असून त्यापैकी के. मलाबादे चौक येथील शॉपिंग सेंटर इमारत निर्लेखित (इमारत नव्याने बांधनेबाबत) प्रस्तावित असलेने त्यामधील शिल्लक असणारे रिकामे गाळे संख्या ३४ वजा जाता ७७ रिकामे गाळे शिल्लक राहतात. म.न.पा. मालकीच्या रिकाम्या असणाऱ्या दुकान गाळेना अल्प प्रतिसाद मिळालेला आहे.

ई निविदा प्रक्रियेस प्रतिसाद न मिळणेची कारणे - १) स्लॅब गळती . २) गाळ्याचे शटर खराब ३) देखभाल दुरुस्ती चा अभाव ४) स्वच्छता गृहांची उपलब्धता नाही. ५) पार्किंग सोय नाही ६) रात्रीचे वेळी गाळ्यांचे समोरच अवैध प्रकार नित्य घडतात. (मद्यपान, फिरस्ते व्यक्ती ची नैसर्गिक विधी , खरकटे टाकणे इ. ) ७) रात्रीचे वेळी सुरक्षा रक्षक (वॉचमन ) नसणे ८) गाळा भाडे रक्कमेवर १८ % जी.एस.टी. +४८ % घरफाळा इ.

इमारतीची देखभाल दुरुस्ती सह उपरोक्त सोयीसुविधा पुरविलेस ई निविदेस प्रतिसाद मिळेल व महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊ शकेल. तसेच मा. उपमहापौरसो यांचे पत्राप्रमाणे भाडे कमी करणेबाबत निर्णय झालेस यापूर्वी ई निविदा पद्धतीने भाडेपट्ट्याने दिलेले दुकान गाळे यांचे भाडे कमी करणेबाबत गाळेधारकांची मागणी होऊ शकते ही बाब विचारात घ्यावी लागेल.

या सर्व बाबीचा विचार करून त्याच बरोबर मा. उपमहापौरसो यांच्या पत्राबाबत मे. महासभेमध्ये निर्णय होणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

Scanned with OKEN Scanner

तरी इचलकरंजी महानगरपालिका मालकीच्या ज्या व्यापारी गाळयांची २ ते ३ वेळा निविदा काढुनही गाळे भाड्याने गेले नाहीत अशा गाळयांचे सद्या असलेल्या भाड्यामध्ये १०% भाडे कमी करुन फेर - निविदा मागविणेस मंजुरी देणेत येत आहे. सदर भाडे कपात फक्त सद्या रिकामे असणा-या व ज्यांची लिलाव प्रक्रीया करणे बाकी आहे. त्यापुरती मर्यादीत राहील.

सूचक : वि. पुं. चोपडे.

अनुमोदक : सु. बा. कलागते.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९५५
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. ०२ : कार्यकारी संपादक दैनिक महासत्ता, इचलकरंजी यांनी महासत्ता चौक नियमानुसार सुशोभिकरण करणेस इच्छुक असलेने तसेच यापुर्वी इचलकरंजी नगरपालिका मा. कौन्सिल ठरावानुसार मंजुरी मिळालेली असलेने महासत्ता चौक सुशोभित करणेस कायम स्वरुपी मंजुरी मिळणेबाबत दि. ०८/०४/२०२६ चे पत्रानुसार विनंती केली आहे. तसेच अध्यक्ष, आम आदमी पार्टी, इचलकरंजी यांनी भारतीय संविधानाच्या आदर्शांना आणि मुल्यांना सलाम करणेसाठी महासत्ता चौक येथे संविधान चौक तयार करणेची दि. २०/०४/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेली आहे. याचबरोबर अविनाश गुलचंद कांबळे, नगरसेवक इ. म. पा. यांनी महासत्ता चौक येथे भारताची राजमुद्रा अशोकस्तंभ याची प्रतिकृती उभारुन सुशोभिकरण करणेची दि. २९/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केले बाबत कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

**ठराव**

कार्यकारी संपादक, दैनिक महासत्ता, इचलकरंजी यांनी पत्र देवुन महासत्ता चौक अतिक्रमणमुक्त व विकास करुन नियमानुसार सुशोभिकरण करणेस इच्छुक असलेने,तसेच यापुर्वी इचलकरंजी नगरपालिका मा.कौन्सिल ठरावान्वये मंजुरी मिळालेने महासत्ता चौक सुशोभित करणेस कायमस्वरुपी मंजुरी मिळणेस विनंती केलेली आहे.

तसेच अध्यक्ष,आम आदमी पार्टी,इचलकरंजी यांनी पत्र देवुन भारतीय संविधानाच्या आदर्शांना आणि मुल्यांना सलाम करण्यासाठी इचलकरंजी शहरात संविधान चौक तयार करणे अत्यंत आवश्यक असलेने इचलकरंजी शहरात संविधान चौक तयार करणेस, संविधान चौकामध्ये संविधानाच्या आदर्शांना दर्शविणारी प्रतिमा,संविधानाची उदेशिका,संविधानाच्या प्रमुख मुल्यांचे,नागरिकांचे कर्तव्य इत्यादी वर्णन करणारे शिलालेख याबाबीचा समावेश करुन महासत्ता चौक येथे संविधान चौक तयार करणेची विनंती केलेली आहे.

तसेच अविनाश गुलचंद कांबळे, नगरसेवक इ. म. पा. यांनी महासत्ता चौक येथे भारताची राजमुद्रा अशोकस्तंभ याची प्रतिकृती उभारुन सुशोभिकरण करणेबाबत पत्रानुसार मागणी केली आहे. याबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यकारी संपादक दै. महासत्ता यांना महासत्ता चौक सुशोभिकरण करणेस मंजुरी देणेत येत असुन महासत्ता चौक सुशोभिकरण करणेत येत असताना त्या ठिकाणी अविनाश कांबळे, नगरसेवक यांनी मागणी केले नुसार अशोकस्तंभ प्रतिकृतीबाबत कार्यकारी संपादक दै. महासत्ता यांचेशी विचार विनीमय करुन त्यांचे वतीने चौक सुशोभिकरण करताना, त्या ठिकाणी अशोकस्तंभ प्रतिकृती उभारणेबाबत सुचविणेत यावे. शक्यतोवर एकमत करणेचा प्रयत्न करणेत यावा. तसेच शहरातील अन्य चौकामध्ये संविधान चौक विकसित करणेबाबत नव्याने प्रस्ताव देणेबाबत आम आदमी पक्ष यांना कळविणेसही मंजुरी देत आहे.

सूचक : वि. पुं. चोपडे.

अनुमोदक : श्री. र. वाळवेकर.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका



Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १५६
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. ०३ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दितील स्मशानभूमीत मृतदेहांच्या होणाऱ्या दहन विधीनंतर शिल्लक राहणाऱ्या अस्थी / राख नदी पात्रात विसर्जीत न करता सदर अस्थी / राख यांचे वैज्ञानिक पद्धतीने वृक्ष संवर्धनासाठी खत म्हणुन वापर करणेसाठी सदरची अस्थी / राख जनस्वातंत्र्य फाउंडेशन यांनी संस्थेला उपलब्ध करुन देणेची मागणी दि. ०५/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केले कामी कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

## ठराव

'जनस्वातंत्र्य फाउंडेशन' या संस्थेकडून महानगरपालिकेस अर्ज प्राप्त झाला आहे. यामध्ये इचलकरंजी शहरातील स्मशानभूमीत होणाऱ्या दहन विधीनंतर उरलेली राख नदीपात्रात विसर्जित न करता, तिचा वैज्ञानिक पद्धतीने वृक्षसंवर्धनासाठी 'खत' म्हणून वापर करण्याची मागणी करण्यात आली आहे. सध्या दहन विधीनंतरची राख नदीपात्रात विसर्जित केली जाते. यामुळे जलप्रदूषण होत असल्याची बाब निवेदनात नमूद केली आहे. राखेतील रासायनिक घटक आणि निसर्गावर होणारा परिणाम लक्षात घेता, पर्यावरणाचे रक्षण करणे आवश्यक आहे.

दहन विधीनंतर निर्माण होणारी राख नदीत न टाकता ती गोळा करावी.गोळा केलेली राख वैज्ञानिक प्रक्रियेद्वारे (Scientific process) खत मिश्रित करून वृक्ष वाढीसाठी (वृक्षसंवर्धन) वापरण्यात यावी. यासाठी सदर राख संबंधित संस्थेला उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून त्याचा नैसर्गिक आणि पर्यावरणपूरक वापर होईल.ही संकल्पना पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने सकारात्मक असलेबाबत व उपरोक्त विषयाचे गांभीर्य आणि पर्यावरणपूरक दृष्टीकोन पाहता, मा. महासभेमध्ये निर्णय होणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका हद्दितील स्मशानभूमीत मृतदेहांच्या होणाऱ्या दहन विधीनंतर शिल्लक राहणाऱ्या अस्थी / राख नदी पात्रात विसर्जीत न करता सदर अस्थी / राख यांचे वैज्ञानिक पद्धतीने वृक्ष संवर्धनासाठी खत म्हणुन वापर करणेसाठी सदरची अस्थी / राख योग्य पद्धतीने कोणत्याही धार्मिक भावना न दुखावता वापर करणेच्या अटीवर जनस्वातंत्र्य फाउंडेशन, इचलकरंजी यांना देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : Satish स.व. कुलीक

अनुमोदक : O.R.Surve ओ. रा. सुर्वे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १५८
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. ०४ : इचलकरंजी महानगरपालिका भगतसिंग उद्यान व राणी बाग येथे नाममात्र प्रवेश फी शुल्क व इतर शुल्क आकारणी करुन सदर उपलब्ध होणारा निधी त्याच ठिकाणी नागरीकांना समाधानकारक सुविधा निर्माण करणेसाठी खर्च करणेबाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिकेची १८ उद्याने व १३ ऑक्सिजन पार्क विकसित करणेत आलेली आहेत.उपरोक्त सर्व उद्याने व ऑक्सिजन पार्क मनपा मार्फत देखभाल दुरुस्ती केली जाते.उद्यानाचा देखभालीचा व दुरुस्तीचा खर्च मोठ्या प्रमाणात आहे

इचलकरंजी महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत शहरातील उद्याने नागरिकांच्या विरंगुळा, आरोग्यदायी उपक्रम तसेच सामाजिक उपयोगासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. सदर उद्यानांमध्ये दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिक भेट देत असून, त्यांचा वापर नियमितपणे होत आहे.

सदर उद्यानांच्या देखभाल व व्यवस्थापनासाठी महानगरपालिकेकडून नियमितपणे खर्च करण्यात येत असून त्यामध्ये स्वच्छता, पाणीपुरवठा, विद्युत व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था तसेच इतर अनुषंगिक खर्चाचा समावेश होतो.

उद्यानावर खर्च होत असून उद्यानाकडून जमा बाजू काहीही नसल्यामुळे खर्चाचा मेळ बसविणे अडचणीचे होत असलेने उद्यानात येणाऱ्या नागरीकांकडुन फी आकारणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला असुन सदर शुल्क आकारणीमुळे उद्यानांसाठी अंदाजे रुपये १०,०५,०००/- इतके वार्षिक उत्पन्न प्राप्त होण्याची शक्यता असून, त्याद्वारे उद्यानांच्या देखभाल खर्चास पूरक निधी उपलब्ध होईल. तसेच उद्यानांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, सुधारणा कामे करणे, वृक्षलागवड करणे व हरित क्षेत्र वाढविणे यासाठी आर्थिक तरतूद करणे सुलभ होईल असे नमुद केले आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका मालकीच्या कोणत्याही उद्यानांसाठी कोणत्याही प्रकारची प्रवेश फी आकारणी करणेचा प्रस्ताव नामंजुर करणेत येत आहे.

सूचक : वि. पुं. चोपडे

अनुमोदक : A. P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९५८
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. ०५ : रमाई आवास योजनेअंतर्गत साईट नं. १०२ येथील ९६ घरकुले लाभार्थी यांना वाटप करणेत आली असुन उर्वरीत घरे पुर्ण करणेबाबत मक्तेदार अभियंता यांची चौकशी करणेबाबत मा. महासभेमध्ये निर्णय होणेकामी अविनाश गुलचंद कांबळे, नगरसेवक यांनी दि. १४/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केलेबाबत कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

**ठराव**

रमाई आवास योजनेअंतर्गत साईट नं.१०२ मध्ये १८१ घरकुल मंजुर होती. त्यामधील ९६ घरकुले पुर्ण झालेली आहेत. ९६ घरकुले लाभार्थी यांना वाटप करणेत आली आहेत. उर्वरीत घरे पुर्ण करणेबाबत मक्तेदार, अभियंता यांची चौकशी करुन कौन्सिल सभेमध्ये विषय घेणेबाबत अविनाश गुलचंद कांबळे, नगरसेवक यांनी दि. १४/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

उपरोक्त कामी मे.कौन्सिल ठराव नं.२३१ दि.१६/०३/२०१३ ने सा.नं.१०२ येथील जागेवर बहुमजली बांधकाम करणेसाठी मंजुरी मिळाली. त्यानुसार सदर कामाचे रक्कम रु.२,७१,५०,०००/- इतक्या रक्मेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले होते.

रमाई आवास योजनेअंतर्गत सा.नं.१०२ मध्ये १८१ घरकुले बांधणेचे काम मक्तेदार परेश कंन्स्ट्रक्शन यांना मे.कौन्सिल ठराव नं.८७ दि.०९/१०/२०१३ ने मंजुर झाले असून दि.०२/०१/२०१४ रोजी मक्तेदार परेश कंन्स्ट्रक्शन कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. सदरचे काम पुर्ण करणेसाठी १ वर्षाचा कालावधी देण्यात आला होता. सदर कामाची मुदत दि.०१/०१/२०१५ रोजी संपुष्टात आली आहे. दरम्यानच्या मुदतीत कामाची गती वाढवून काम पुर्ण करुन देणेबाबत मक्तेदारास दि.१४/०७/२०१४ दि.०७/११/२०१४ व दि.११/१२/२०१४ रोजी काम पुर्ण करणेबाबत नोटीस देण्यात आलेल्या आहेत. मात्र मक्तेदाराकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याने निविदा रद्द करुन जामीनदाराकडून काम करुन घेणे किंवा पुढील कार्यवाहीसाठी धोरणात्मक निर्णय घेणेसाठी दि.२२/०६/२०१५ चा प्रस्ताव मे.कौन्सिलकडे सादर करणेत आला. सदरच्या प्रस्ताबाबत दि.१३/०१/२०१६ चे मे.कौन्सिल सभेमध्ये प्रस्ताव पुढील मिटींगसमोर ठेवणे संबधी ठ.क्रं.२०४ पारित करणेत आला.

या अनुषंगाने कोणताही निर्णय न झालेने अणि मक्तेदाराने ६ इमारती पैकी २ इमारती वरील लाइट पोल शिफ्ट झाले नसलेने मुदतवाढ मागणीबाबत दि.३०/१२/२०१७ रोजी अर्ज दिल्याने दि.१७/०१/२०१८ चा प्रस्ताव मे.कौन्सिलकडे सादर करणेत आला. त्यानुसार मे.कौन्सिल ठराव नं.३२४ दि.१७/०२/२०१८ ने मक्तेदारास १ वर्ष मुदतवाढ मंजूर करण्यात आली. तसेच काम गतीने करुन पूर्ण करुन देणेबाबत दि.१५/१०/२०१८, ०८/०१/२०१९ व १७/०१/२०१९ ला मक्तेदारास नोटीस देणेत आल्या. मात्र नोटीस देऊनही कामात प्रगती न झाल्याने निविदा रद्द करुन घेणेबाबत निर्णयासाठी पुन्हा मा.कौन्सिलकडे सादर केला असता दि.२९/०६/२०१९ ने १ वर्ष मुदतवाढ मंजूर करण्यात आली.

उक्त ठरावाचे अनुषंगाने मक्तेदारास कोणत्याही परिस्थितीत दि.०३/१२/२०१९ पर्यंत काम पुर्ण करुन देणेबाबत दि.२६/०७/२०१९ रोजी नोटीस देण्यात आली मात्र मक्तेदाराकडून कार्यवाही झाली नसल्याने मक्तेदारास कोणत्याही परिस्थीतीत दि.३०/११/२०२० पूर्वी काम पुर्ण करणेबाबत अन्यथा यापुढे दंडात्मक कारवाई सह निविदा रद्द करुन करारपत्रातील अटी/शर्ती प्रमाणे शिल्लक कामाकरीता पुढील नियमबध्द कारवाई करणेत येईल अश्या आशयाची दि.२३/१०/२०२० रोजी नोटीस देण्यात आली.

त्यावर मक्तेदाराकडून दि.०४/११/२०२० दि२८/०१/२०२१ चे अर्ज देवून साईटवरील एक इलेक्ट्रीक पोल व एक बाजूची H.T.LINE काढलेली नसल्याने १ वर्ष मुदतवाढ व दरवाढ मागणी करणेत आली त्यानुसार मे.कौन्सिल ठ.नं.९० दि.०६/०८/२०२१ ने दि.३१/१२/२०२१ अखेर मुदतवाढ व ६६.६०% दरवाढ मंजूर केली.

तथापि एकूण ०६ इमारती पैकी ०२ इमारतीचे बांधकामास इलेक्ट्रीक पोल व H.T.LINE चा अडथळा होत असला तरी उर्वरीत ०४ इमारतीचे बांधकाम मक्तेदाराने पुर्ण करणे आवश्यक होते.

मात्र ०६ इमारती पैकी ०२ इमारतीचे काम जवळपास पूर्ण झालेने सदर इमारतीमध्ये निवास योग्य आवश्यक असणा-या बाबींचे काम दि.३१/१२/२०२१ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना मक्तेदारास देणेत आल्या त्यानुसार मा.जिल्हाधिकारीसो यांचे निर्देश मा.कौन्सिलचे निर्देशनास आणून ९६ घरकुलांचा ताबा १८१ लाभार्थी यादीतील प्रथम १ ते ९६ लाभार्थी यांना देणेकामी मे.कौन्सिल ठ.नं.१८७ दि.२९/१२/२०२१ ने मान्यता मिळाल्याने १ ते ९६ लाभार्थी यांना घरकुल ताबा देणेत आलेला आहे.

Scanned with OKEN Scanner

सदरकामी मक्तेदार यांना एकूण १३ धावते देयके रक्कम रु.२,२४,०१,९३९/- इतकी अदा करणेत आली आहेत त्यातून ८,९६,९८०/- इतकी सुरक्षा ठेव राखून ठेवली आहे.

सदरचे काम पुर्ण करणेबाबत मक्तेदार यांना जा.क्र./बांधकाम विभाग/८०१/२०२४ दि.१६/०८/२०२४ रोजी अंतिम नोटीस देणेत आलेली होती. मक्तेदार यांचेकडून कोणताही खुलासा प्राप्त न झाल्याने मा.प्रशासक ठराव क्रं.४८/२०२४ (मा.महासभा) दि.२६/०९/२०२४ रोजीच्या ठरावन्वये शासन निर्णय क्र.संकीर्ण/०५/०६/प्र.क्र.५३/इमा.२ दि.२८/०९/२००६ चे नुसार काळया यादीत समाविष्ट करुन अन्य शासकीय निमशासकीय विभागांना कळविणेबाबत व सदरचे अर्धवट झालेल्या कामामुळे महानगरपालिकेचे नुकसान झाल्याने नुकसान भरपाई पोटी सुरक्षा अनामत रक्कम रु.८,५२,२८०/- जप्त करणेस व उर्वरित रक्कम व्याजासह वसुली करणेस सदर ठरावान्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

वरील प्रमाणे वस्तुस्थिती पहाता मक्तेदार यांना वारंवार मुदतवाढ देणेत आलेली आहे व मक्तेदार यांना ६६.६०% दरवाढ देवूनही मक्तेदार यांनी ६ पैकी दोनच इमारतींचे काम पूर्ण केले आहे. सदर घरकुल आवास योजनेसाठी आलेला सगळा निधी खर्च झाला असलेने नव्याने या योजनेसाठी निधी मिळणार नसलेने याकामी मक्तेदार परेश कन्स्ट्रक्शन यांना रमाई आवास योजने अंतर्गत मंजुर असलेल्या सर्व सदनिका पूर्ण करुन देणेबाबत कळविणेत यावे याप्रमाणे मक्तेदार यांनी काम पूर्ण न केलेस त्यांना में.कौन्सिल ठ.नं.९० दि.०६/०८/२०२१ ने देणेत आली ६६.६०% दरवाढीची रक्कम वसूल करणेची कारवाई करावी अथवा सदरची रक्कम महानगरपालिकेची येणे रक्कम म्हणून मक्तेदार यांचे मालमत्ता पत्रकी नोंदणविणेची कार्यवाही कार्यालयाने करावी.

सूचक : Satish

अनुमोदक : P.S.Mali

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १५८
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. ०६ : भगतसिंग उद्यानाचे ईशान्य कोपऱ्यात खाऊ गल्ली करणेबाबत श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी दि. २९/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केले कामी दि. २५/०६/२०२६ चे सभेमध्ये पुढील मिटींग समोर ठेवणेबाबत झालेल्या निर्णयाचा विचार करणे.

## ठराव

भगतसिंग उद्यानाचे ईशान्य कोपऱ्यात खाऊ गल्ली करणेबाबत श्री. विठ्ठल पुंडलिक चोपडे, सभागृह नेता यांनी दि. २९/०५/२०२६ चे पत्रानुसार मागणी केली आहे.

इचलकरंजी महानगरपालिकेच्या मालकीचे सुमारे १३ एकर क्षेत्रामध्ये भगतसिंग उद्यान असून त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात लोक लहान मुले, महिला पर्यटनासाठी येतात. सकाळी व संध्याकाळी या ठिकाणी मोठी गर्दी असते त्यामुळे बागेच्या बाजूला मोठ्या प्रमाणात फेरीवाले खाद्यपदार्थ विकणे साठी आलेले असतात. सदर उद्यानाच्या उत्तरपूर्व (ईशान्य) कोपऱ्यामध्ये बंदिस्त संरक्षण भिंत असणारी सुमारे ४००० चौरस फुट पेक्षा जास्त रिकामी जागा आहे. सदर ठिकाणी खाऊ गल्ली निर्माण केलेस बगिच्याशेजारील तसेच महेश क्लब जवळील नोंदणीकृत फेरीवाल्यांचे पुनर्वसन त्या ठिकाणी करता येईल. सदर ठिकाणी खाऊ गल्ली निर्मिती करून,आवश्यक त्या सोई सुविधा उपलब्ध करून देऊन महेश क्लब व उदयाना शेजारी नोंदणीकृत फेरीवाल्यांचे त्या ठिकाणी पुनर्वसन करणेबाबतचा प्रस्ताव नजीकच्या मा. महासभेमध्ये सादर करणेबाबत मा. सभागृह नेता श्री. विठ्ठल चोपडे यांनी मागणी केली आहे.

तरी भगतसिंग उद्यानाचे ईशान्य कोपऱ्यात असणाऱ्या रिकाम्या जागेत उत्तरेकडील भागात वैरण विक्रीकरीता काही जागा शेतकऱ्यांना राखुन ठेवावी, त्याठिकाणी त्यांना आवश्यक सोईसुविधा निर्माण करण्यात याव्यात. त्यांचे करीता उत्तर बाजुचे संरक्षण भिंतीमधुन स्वतंत्र दरवाजा निर्माण करण्यात यावा, दक्षिण बाजुस पूर्व पश्चिम भिंत बांधुन सदर भिंतीच्या दक्षिण बाजूस सर्व सुविधा देवून खाऊ गल्ली करावी, त्याकरीता पूर्व बाजुस दरवाजा (गेट) करुन खाऊ गल्ली करीता बागेतील व्यक्तींना प्रवेशासाठी बागेकडील बाजूस (पश्चिमेस देखील) एक छोटे गेट करणेत यावे. यामध्ये प्राधान्याने महेश क्लब जवळील नोंदणीकृत फेरीवाल्यांचे पुनर्वसन करावे त्यांना त्याठिकाणी पुनर्वसन नको असलेस अन्य ठिकाणचे फेरीवाल्यांचा या ठिकाणी विचार व्हावा यासाठी ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक : वि. पुं. चोपडे

अनुमोदक : सु. बी. कब्बागते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १६०
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. ०७ : इचलकरंजी शहर नळ पाणीपुरवठा योजना (कृष्णा नदी राधाकृष्ण मंदीर जुने दानवाड उदभव ) करीता पाणीपुरवठा योजनेची आखणी करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करणे व योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन मा. शासनास सादर करणेबाबत कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

**ठराव**

सदर विषयाबाबत लेखी सुचना आली, त्यास एक उपसुचना प्राप्त झाली. ती खालील प्रमाणे.

**उपसुचना**

इचलकरंजी महानगरपालिकेच्या सभा क्रमांक ०६ मधील पुरवणी कार्यक्रम पत्रिका विषय क्रमांक ०२ अंतर्गत इचलकरंजी शहराच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्त करण्याचा प्रस्ताव सभेपुढे ठेवण्यात आला आहे. या प्रस्तावासंदर्भात विरोधी पक्षाच्या वतीने पुढील हरकती व भूमिका नोंदविण्यात येत आहे.

सर्वप्रथम, शहरासाठी नवीन व शाश्वत पाणीपुरवठा योजना होणे ही काळाची गरज असून त्यास आमचा कोणताही विरोध नाही. उलट शहराच्या भविष्यासाठी सक्षम, दर्जेदार व दीर्घकालीन पाणी योजना तातडीने राबविणे आवश्यक आहे. अशा मोठ्या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करणेही आवश्यक आहे.

मात्र, प्रशासनाने कोणतीही खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया न राबविता थेट यश कन्सल्टन्सी प्रा. लि., नवी मुंबई यांची नियुक्ती करण्याची शिफारस केली आहे. ही प्रक्रिया पारदर्शकता, स्पर्धात्मकता व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने योग्य वाटत नाही.

सदर कंपनीकडे सध्या इचलकरंजी महानगरपालिकेच्या सुमारे र.रू.५२० कोटींच्या भुयारी गटार योजनेचे PMC काम आहे. प्रत्यक्षात या कामामध्ये अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचे काम, कामातील विलंब, गुणवत्तेवर नियंत्रणाचा अभाव, तसेच PMC कडून नियमित स्पॉट व्हिजिट न होणे अशा अनेक गंभीर तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. प्रत्यक्ष देखरेखीऐवजी केवळ फी घेण्यापुरतीच भूमिका या कंपनीने बजावल्याचे चित्र दिसून येत आहे.

याशिवाय, शहरातील जिव्हाळ्याचे मोठे तळे विकास प्रकल्प यासाठीही याच कंपनीची नियुक्ती करण्यात आली होती. सन २०२३ मध्ये सुरू झालेले हे काम आजतागायत पूर्ण झालेले नाही. कामामध्ये अनियमितता, निकृष्ट दर्जा व विलंब याबाबत सातत्याने नागरिकांकडून आक्षेप नोंदविले गेले आहेत.

दोन्ही प्रकल्पांच्या अनुभवावरून सदर कंपनी कामाच्या गुणवत्तेबाबत, गतीबाबत व प्रत्यक्ष देखरेखीबाबत गंभीरपणे जबाबदारी पार पाडत नसल्याचे दिसून येते. उलट संबंधित मक्तेदारांना पोषक ठरेल अशा प्रकारचा पत्रव्यवहार झाल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे इतक्या महत्त्वाच्या पाणीपुरवठा योजनेची जबाबदारी पुन्हा याच कंपनीवर सोपविणे शहराच्या हिताविरुद्ध ठरेल.

इचलकरंजी शहराचा भविष्यातील पाणीपुरवठा हा लाखो नागरिकांच्या जीवनाशी संबंधित अत्यंत संवेदनशील विषय आहे. त्यामुळे अशा योजनेसाठी अनुभवी, सक्षम, पारदर्शक व उत्कृष्ट कामगिरीचा सिद्ध अनुभव असलेल्या संस्थेचीच निवड होणे आवश्यक आहे.

त्यामुळे आमची स्पष्ट मागणी पुढीलप्रमाणे आहे -

१. यश कन्सल्टन्सी प्रा. लि., नवी मुंबई यांची थेट नियुक्ती करण्याचा प्रस्ताव तात्काळ रद्द करण्यात यावा.

२. या कामासाठी खुली, पारदर्शक व स्पर्धात्मक ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

३. पात्रता, अनुभव, तांत्रिक गुणवत्ता व आर्थिक निकषांच्या आधारे सर्वोत्तम कंपनीची PMC म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

४. महानगरपालिकेच्या विद्यमान कामांमध्ये समाधानकारक कामगिरी न करणाऱ्या सल्लागारांच्या कामकाजाचे परीक्षण करून आवश्यक ती कारवाई करण्यात यावी

५. महानगरपालिकेच्या निधीचा योग्य वापर, दर्जेदार कामे व नागरिकांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी सक्षम PMC ची निवड करण्यात यावी.

जर प्रशासनाने वरील सर्व बाबींकडे दुर्लक्ष करून केवळ बहुमताच्या जोरावर अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव यश कन्सल्टन्सी प्रा. लि. यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला, तर या निर्णयाविरोधात माननीय विभागीय आयुक्त, नगरविकास विभाग तसेच आवश्यकतेनुसार माननीय मुंबई उच्च न्यायालयात कायदेशीर दाद मागण्याचा अधिकार आम्ही राखून ठेवत आहोत.

तरी सदर प्रस्तावाचा पुनर्विचार करून यश कन्सल्टन्सी प्रा. लि. यांची नियुक्ती न करता खुल्या निविदा प्रक्रियेद्वारे सक्षम व पात्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात यावी.

सुचक – उ.मा. पाटील    अनुमोदक – अ. रा. जाधव.

वरील उपसुचना मतास टाकली असता त्यास ,

अनुकुल मते – १२    प्रतिकुल मते – ४१    तटस्थ – ०

वरील प्रमाणे मतदान होऊन सदरची उपसुचना बहुमताने नामंजुर करणेत आली.

Scanned with OKEN Scanner

यानंतर खालील प्रमाणे आलेली मुळ सुचना वाचणेत आली.

अमृत २.० अभियाना अंतर्गत इचलकरंजी शहर नळ पाणी पुरवठा योजना (दुधगंगा नदी उदभव) करीता दि. ०२/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेस अनुसरून निविदा प्रक्रिया राबविणेत आली असून निविदेचा वित्तीय लिफाफा उघडणे पर्यंतची कार्यवाही पुर्ण करणेत आलेली आहे. दरम्यानच्या मुदतीत दूधगंगा नदी काठावरील ग्रामस्थांनी या योजनेस विरोध केलेने योजनेची अंमलबजावणी होऊ शकली नाही ही वस्तुस्थिती आहे. यावर योजना अंमलबजावणी करणेकरीता मा. मुख्यमंत्री महोदय यांचे आदेशान्वये मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणेत आली असून सदर समितीने दि.०९/०८/२०२४ रोजी या योजनेच्या कार्यवाहीचा अहवाल नगरविकास विभागास सादर केला आहे. सदर अहवालास अनुसरून मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दि.२१/०३/२०२५ रोजी विधानभवन मुंबई येथे बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये कोणताही तोडगा न निघालेने अन्य पर्यायांचा विचार होऊन तोडगा काढणेकामी पुढील बैठक घेणेचे निश्चित केले होते. त्याप्रमाणे दि. १८/०६/२०२६ रोजी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली इचलकरंजी शहर पाणीपुरवठा योजनेच्या अमंलबजावणी करीता वर्षा निवासस्थान, मुंबई येथे बैठक पार पडली आहे. सदर बैठकीकरीता मा.खा.धैर्यशिल माने, मा.आम.राहूल आवाडे, मा.आयुक्त इचलकरंजी महानगरपालिका, मा. सदस्य सचिव, मा.मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मा. प्रधान सचिव, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग इ. अधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये मा. आमदार महोदय यांनी इचलकरंजी शहर पाणी पुरवठा प्रकल्पाच्या अनुषंगाने सादरीकरण केले. सदर सादरीकरणामध्ये यापुर्वी केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत इचलकरंजी शहरासाठी दुधगंगा नदी सुळकुड उदभवावरुन दि. ०२/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे मंजुर करणेत आलेल्या योजनेस स्थानिक नागरीकांचा विरोध असलेमुळे योजना कार्यान्वित करणे शक्य नसलेने कृष्णा नदीवरील महाराष्ट्र राज्यातील अंतिम गाव - जुने दानवाड गावा जवळील राधा-कृष्ण मंदीर लगत उद्भव ग्राह्य धरून नवीन योजना मंजूर करणेकरीता मा.मुख्यमंत्री महोदय यांना विनंती केली त्यानुसार नमुद निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करणेची निर्देश प्राप्त झाले आहेत. ते पुढीलप्रमाणे,

| अ.क्र. | विषय | बैठकीत झालेली चर्चा व निर्णय |
|---|---|---|
| १ | इचलकरंजी शहरास सद्यस्थिती पंचगंगा नदी उद्भव व कृष्णा नदी मजरेवाडी उद्भव या दोन पाणीपुरवठा योजनांव्दारे शहरास पाणीपुरवठा करण्यात येत असल्याचे लोकप्रतिनिधींनी नमूद केले. स्थानिक बैठकीत इचलकरंजी शहरासाठी कायम स्वरुपी पाणीपुरवठा करण्यासाठी केंद्र पुरस्कृत अमृत २. अभियानांतर्गत दुधगंगा नदी, सुळकुड उद्भवावरुन रु. १६०.८४ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दि. ०२ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि, स्थानिक नागरीकांच्या विरोधामुळे योजना कार्यान्वित करणे शक्य झाले नसल्याचे आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांनी नमूद केले आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी व आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांनी कुंभोज, दानोळी, काळम्मावाडी, म्हैशाळ इ. उद्भवाची पाणीपुरवठा योजनेसाठी चाचपणी केली असता स्थानिकांनी विरोध दर्शविल्याचे बैठकीत नमूद केले.तदनंतर, इचलकरंजी शहराकरीता कृष्णा नदीवरुन जुने दानवाड गावाजवळील राधाकृष्ण मंदिराशेजारी उद्भव ग्राह्य धरुन राधाकृष्ण पाणीपुरवठा योजनेबाबत बैठकीत चर्चा झाली. | अ.) दुधगंगा नदी सुळकुड उद्भव व्दारे प्रस्तावित केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियानांतर्गत मंजूर पाणीपुरवठा स्थानिक प्रकल्पास नागरीकांच्या विरोधामुळे योजना कार्यान्वित : करण्याचे शक्य नसल्याचे चर्चेअंती बैठकीत निदर्शनास आले.त्यामुळे इचलकरंजी शहरासाठी पाणीपुरवठा करण्यासाठी कृष्णा नदीवरुन जुने दानवाड गावाजवळील राधाकृष्ण मंदिराशेजारी उद्भव ग्राह्य धरुन राधाकृष्ण पाणीपुरवठा योजनेची चाचपणी करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले.<br>ब.) कृष्णा नदीवरुन जुने दानवाड गावाजवळील राधाकृष्ण मंदिराशेजारी उद्भव ग्राह्य धरुन राधाकृष्ण पाणीपुरवठा योजनेचा व्यवहार्यता अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सादर करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले.<br>क.) पंचगंगा नदी, वारणा नदी व कृष्णा नदी या तिन्ही स्रोतामधून इचलकरंजी शहरास मंजूर असणाऱ्या पाणी आरक्षणास अनुसरुन पाणी उपलब्धता अहवाल प्राथम्याने सादर करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले.<br>ड.) कृष्णा नदीवरुन जुने दानवाड गावाजवळील राधाकृष्ण मंदिराशेजारी उद्भव ग्राह्य धरुन राधाकृष्ण पाणीपुरवठा योजनेच्या अनुषंगाने पाणी उपलब्धता अहवाल व पुर्व व्यवहार्यता अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावित पाणीपुरवठा योजनेच्या अनुषंगाने तपासणी करुन जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले.<br>इ.) इचलकरंजी महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीच्या अनुषंगाने बैठकीत चर्चा झाली. सदर चर्चेअंती इचलकरंजी महानगरपालिकेने उत्पन्न वाढविण्याच्या अनुषंगाने आवश्यक उपाय योजना प्राथम्याने राबविण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले. |

वरील नमुद केले प्रमाणे इचलकरंजी महानगरपालिकेस १. कृष्णा नदीवरुन जुने दानवाड गावाजवळील राधा कृष्ण मंदिर शेजारी उदभव ग्राहय धरुन राधाकृष्ण योजनेची चाचपणी करणे, २. जलसंपदा विभागामार्फत पाणी उपलब्धता अहवाल व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत योजनेचा पुर्व व्यवहार्यता अहवाल प्राप्त झालेनंतर या योजनेच्या अनुषंगाने तपासणी करुन मा. जिल्हाधिकारीसो, कोल्हापुर यांचे स्वयंम स्पष्ट अहवालासह शासनास अहवाल सादर करणे, ३. योजनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवणेकरीता आवश्यक त्या उपाययोजना करणेबाबत निर्देश देणेत आलेले आहेत या प्रमाणे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

Scanned with OKEN Scanner

त्याच बरोबर मा.आमदार महोदय यांनी इचलकरंजी शहराचा पाणी प्रश्न सोडवणेकरीता जुने दानवाड येथील राधाकृष्ण मंदिर नजिक उदभव गृहीत धरुन योजना कार्यान्वित करणेकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तात्काळ तयार करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणुक होणे तसेच याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेकरीता पुढील कार्यवाही करणेकामी पत्रान्वये कळविले आहे.

वरील सर्व बाबींचे अवलोकन होता या योजनेची आखणी करणे करीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे क्रमप्राप्त आहे. सध्या इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत सुरु असणा-या विविध पाणी पुरवठा, भुयारी गटार योजना, आप्पती सोम्मीकरण योजना यांचा विचार करता तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करतेवेळी शासनामार्फत निर्गमित केलेले मार्गदर्शक सुचना, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नामिका या सर्वांचा विचार करता, सध्या शासनाच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नामिकेमधील व महानगरपालिकेच्या सध्या असलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नामिकेमधील यश इंजिनिअरिंग कन्सल्टंन्सी प्रा.लि. यांचा प्रस्तावित योजनेकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन विचार होणे आवश्यक वाटत असलेबाबत व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुद (७२) नुसार अधिकाराचा वापर करणे हे महानगरपालिकेने आवश्यक खर्चास मंजूरी देणेचे अधिन असणे -

कलम ८६, पोट कलम (२) किंवा कलम ३५५, पोट कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबीं व्यतिरिक्त, कोणताही नगरपालिका प्राधिकारी, ज्यात खर्च अंतर्भुत असेल अशा या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार त्याला प्रदान करणेत आलेल्या अधिकारांचा वापर करताना किंवा त्याच्याकडे सोपवलेले कोणतेही कर्तव्य पार पाडताना, पुढील शर्तीच्या अधिन असेल.

अ) ज्या सरकारी वर्षात अशा अधिकारांचा वापर केला असेल किंवा असे कर्तव्य पार पाडले असेल त्या वर्षात, असा खर्च जितपत करावयाचा असेल तितपत, त्या खर्चासाठी चालू अर्थसंकल्पीय अनुदानात अशा खर्चाची तरतूद केली असली पाहिजे;

ब) अशा अधिकाराचा वापर केल्यामुळे किंवा असे कर्तव्य पार पाडल्यामुळे असे सरकारी वर्ष संपल्यावर कोणत्याही कालावधीसाठी किंवा कोणत्याही वेळी खर्च करावा लागणार असेल किंवा खर्च होण्याचा संभव असेल तर, अशा खर्चाचे दायित्व पत्करण्यापुर्वी महानगरपालिकेची मंजूरी घेतली पाहिजे या कलमानुसार अंमलबजावणी करणे या योजनेच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणुक करणेकरीता आवश्यक आहे. तसेच दि. १६/०९/२०२२ चे बाब ३ (आ) नुसार शासन परिपत्रकामधील सल्लागार नेमणेची थेट कार्यवाही करणेचे अधिकार महानगरपालिकेस प्राप्त आहेत.

त्याचप्रमाणे, याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार अनुसुची ड प्रकरण ५ मधिल बाब-२. विवक्षित संविदासाठी निविदा मागविणे. मधील र.रु. २ लाख रूपयांपेक्षा अधिक किंवा महानगरपालिका राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी विहीत करीत अशा त्याहून अधिक रक्कमेपेक्षा अधिक खर्च होणार असेल असे कोणतेही काम करणेबाबत संविदा मागविणेच्या कार्यप्रणालीतील पोट कलम (२) च्या परंतूकामध्ये नमूद केले प्रमाणे शासनाचे निर्देश व मान्य नामिकेतील सल्लागार असलेने निविदा न मागविता संविदा करणेस आयुक्तांना देणेत आलेल्या अधिकारांचा वापर करून निविदा न मागविता संविदा करणेस आयुक्तांना असलेल्या अधिकार या सर्व बाबींचा विचार करुन यश इंजिनिअरिंग कन्सल्टंट प्रा.लि.,नवी मुंबई यांना विना निविदा कार्यारंभ आदेश देता येणे शक्य आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करून यश इंजिनिअरिंग कन्सल्टंट प्रा.लि. यांना इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रामध्ये काम करणेचा असलेला अनुभव, यश इंजिनिअरिंग कन्सल्टंट यांचा शासन मान्य व महानगरपालिकेतील नामिकेतील असलेला समावेश, महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्र.क्र. ५.२ (२) कलम ७३, खंड (क) च्या तरतुदी यांचे अवलोकन होऊन विषयांकीतकामी इचलकरंजी शहर नळ पाणी पुरवठा योजना कृष्णा नदी जूने दानवाड उद्भव करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती देणे व मध्ये मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या निर्देशांचे पालन करुन या योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनास सादर करणेस मान्यता मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी शहर नळ पाणीपुरवठा योजना (कृष्णा नदी राधाकृष्ण मंदीर जुने दानवाड उदभव ) करीता पाणीपुरवठा योजनेची आखणी करणेकामी यश इंजिनिअरिंग कन्सल्टंट प्रा.लि.,नवी मुंबई यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करणेस मंजुरी देणेत येत असुन यश इंजिनिअरिंग कन्सल्टंट प्रा.लि. यांचे कडुन योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन मा. शासनास सादर करणेत यावा.

सुचक – वि. पु. चोपडे अनुमोदक – स.व.मुळीक.

वरील मुळ सुचना मतास टाकली असता त्यास,

अनुकुल मते – ४१ प्रतिकुल मते – १२ तटस्थ – ०

वरील प्रमाणे मतदान होऊन मुळ सुचना बहुमताने मंजुर करणेत आली.

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ७६७
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. ०८ : माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या बक्षीस रक्कमेतुन पर्यावरणपुरक विकास कामांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

**ठराव**

महाराष्ट्र शासन, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मावअ-०२२६/प्र.क्र.४९/तां.क.१, दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ अन्वये "माझी वसुंधरा अभियान ५.०" चा अंतिम निकाल जाहीर करण्यात आलेला आहे. सदर अभियानामध्ये इचलकरंजी महानगरपालिकेने उल्लेखनीय व उत्कृष्ट कामगिरी करत १ ते ३ लाख लोकसंख्या गटामध्ये राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त केला असून त्याबद्दल रु.५.०० कोटी बक्षीस रक्कम तसेच भूमी (Land) थीमॅटिकमध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल रु.२.०० कोटी बक्षीस रक्कम जाहीर करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे इचलकरंजी महानगरपालिकेस एकूण रु.७.०० कोटी (रुपये सात कोटी फक्त) इतकी बक्षीस रक्कम प्राप्त होणार आहे.

शासन निर्णयामध्ये बक्षीस रकमेच्या विनियोगाबाबत स्पष्ट कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली असून सदर रकमेचा उपयोग पंचतत्त्वांच्या संरक्षण, संवर्धन व पर्यावरणपूरक विकासकामांसाठीच करावयाचा आहे. त्यामध्ये हरित क्षेत्र वाढविणे, मियावाकी वन, अमृत वन, स्मृती वन, शहरी वने, सार्वजनिक उद्याने, जैवविविधता संवर्धन, रोपवाटिका निर्मिती, जलसंवर्धन, रेन वॉटर हार्वेस्टिंग, तलाव व नाल्यांचे पुनरुज्जीवन, सौरऊर्जा, एलईडी आधारित ऊर्जा बचत प्रकल्प, इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधा तसेच इतर पर्यावरणपूरक उपाययोजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

सदर शासन निर्णयानुसार बक्षीस रकमेच्या विनियोगासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रथम सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report - DPR) तयार करणे आवश्यक आहे. तसेच एकूण बक्षीस रकमेपैकी किमान ५० टक्के निधी हरित क्षेत्र वाढविण्यासाठी खर्च करणे बंधनकारक असून उर्वरित निधी इतर पर्यावरणपूरक उपाययोजनांवर खर्च करावयाचा आहे. तयार करण्यात येणाऱ्या DPR मधील कामांना तांत्रिक मान्यता प्राप्त करून शासनाकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतरच पुढील निधी वितरित करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील विविध उद्याने, हरित पट्टे, खुली मैदाने, शहरी वने, जलसंवर्धन प्रकल्प, पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा, जैवविविधता संवर्धन, वृक्षारोपण, उद्यानांचे आधुनिकीकरण तसेच शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या इतर पर्यावरणपूरक विकासकामांचा समावेश असलेला सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे आवश्यक आहे. सदर DPR तयार करण्यासाठी आवश्यक स्थळ पाहणी, सर्वेक्षण, संकल्प आराखडे, सविस्तर आराखडे, अंदाजपत्रके, तांत्रिक बाबी, आर्थिक नियोजन, पर्यावरणीय अभ्यास, नकाशे, सादरीकरण, शासनाकडे प्रस्ताव सादर करणे व त्यासंबंधित सर्व आवश्यक कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

शासन निर्णयातील तरतुदीनुसार सादर करण्यात येणाऱ्या सविस्तर प्रकल्प अहवालास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता व शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त करणे आवश्यक असल्याने सदर DPR तयार करण्याची कार्यवाही तातडीने सुरू करणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक त्या तज्ज्ञ संस्था/सल्लागार यांची नियुक्ती करून शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार DPR तयार करण्यात येणार आहे.

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये (DPR) समाविष्ट करण्यात येणाऱ्या कामांच्या अनुषंगाने मा. स्थायी समिती सभापती, मा. उपमहापौर, मा. उपायुक्त,मा.उद्यान पर्यवेक्षक यांनी संयुक्तपणे प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली आहे.

सदर पाहणीमध्ये (१) कोल्हापूर नाका येथे सुमारे ५,००० चौ.फुट क्षेत्रामध्ये रोपवाटिका (Nursery) विकसित करणे, (२) प्रभाग क्र. १४ मधील नोबेल हॉस्पिटलच्या मागील बाजूस उद्यान विकसित करणे, (३) प्रभाग क्र. ४ येथे मियावाकी वन विकसित करणे, (४) प्रभाग क्र. १५ येथे मियावाकी वन (मनोज शेखे परिसर) विकसित करणे तसेच (५) प्रभाग क्र. १४, वसंत कॉलनी येथे ऑक्सिजन पार्क विकसित करणे, अशी प्राथमिक कामे नियोजित करण्यात आली आहेत.

सबब, माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या रु.७.०० कोटी बक्षीस रकमेच्या विनियोगासाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यास तसेच त्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यास मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

Scanned with OKEN Scanner

तरी माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या बक्षीस रक्कमेतुन (१) कोल्हापूर नाका येथे सुमारे ५,००० चौ.फुट क्षेत्रामध्ये रोपवाटिका (Nursery) विकसित करणे, (२) प्रभाग क्र. १४ मधील नोबेल हॉस्पिटलच्या मागील बाजूस उद्यान विकसित करणे, (३) प्रभाग क्र. ४ येथे मियावाकी वन विकसित करणे, (४) प्रभाग क्र. १५ येथे मियावाकी वन (मनोज शेखे परिसर) विकसित करणे तसेच (५) प्रभाग क्र. १४, वसंत कॉलनी येथे ऑक्सिजन पार्क विकसित करणे, यासह (६) प्रभाग क्र. ६ (राजराजेश्वरी नगर) येथील ओपन स्पेसवर उद्यान विकसित करणे या विकास कामांसाठी पर्यावरणपुरक सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : वि. पुं. चोपडे

अनुमोदक : रा. सं. भोंड्रे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १६२
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. ०९ : इचलकरंजी शहरातील महिला व युवतींसाठी विविध सार्वजनिक ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन बसविणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. १९ दि. १५/०६/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी शहरामध्ये महिला व युवतींची संख्या मोठ्या प्रमाणात असून शाळा, महाविद्यालये, शासकीय, सार्वजनिक ठिकाणे, बसस्थानके, क्रीडा संकुले तसेच बाजारपेठ परिसरामध्ये महिलांची सतत वर्दळ असते मासिक पाळीच्या काळात महिलांना व युवतींना स्वच्छ व सुरक्षित सॅनिटरी नॅपकिन सहज उपलब्ध होण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे.

ही सदर सुविधा उपलब्ध झाल्यास महिलांचे आरोग्य, स्वच्छता व सुरक्षितता यास मोठ्या प्रमाणात मदत होईल. "स्वच्छ भारत अभियान" व महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीनेही योजना उपयुक्त ठरणार आहे.

सदर व्हेंडिंग मशीन बसविणेस बाबत खालील निश्चित जागा पाहणी करून जागेचा सर्वे करून जुने मशीन खराब असल्यास नवीन मशीन बसविणे त्याअनुषंगाने खालील प्रमुख ठिकाणी टप्प्याटप्याने सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन बसविणेबाबत महीला व बालकल्याण समिती ठराव क्र. १९ दि. १५/०६/२०२६ नुसार मा.महासभेकडे शिफारस करणेत आली आहे.

१) महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारत
२) जुनी महानगरपालिका कार्यालय
३) बसस्थानक
४) गुरुवर्य रवींद्रनाथ टागोर वाचनालय
५) राजीव गांधी सांस्कृतिक भवन
६) नाट्यगृह

तरी महीला व बालकल्याण समितीचे शिफारशीनुसार वरील प्रमाणे नमूद ठिकाणी जुने मशीन खराब असल्यास नवीन मशीन बसविणेस व त्याअनुषंगाने टप्प्याटप्याने सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीन बसविणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : Satish – स. व. मुळीक

अनुमोदक : O. R. Surve – ओ. रा. सुर्वे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. 963
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. १० : इचलकरंजी शहरामध्ये विविध ठिकाणी अंगणवाडी इमारती बांधकाम करणेबाबत मा.सदस्य यांनी दिले पत्राबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. २० दि. १५/०६/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी शहरातील विविध ठिकाणी अंगणवाडी बांधकाम करणे बाबत बालविकास प्रकल्प अधिकारी नागरी प्रकल्प कोल्हापूर - इचलकरंजी, मा. सौ. जुलेखा जहाँगीर पटेकरी (नगरसेविका) , मा. श्री. मनोज हिंगमिरे (नगरसेवक) यांनी मागणी केली आहे, त्यानुसार खालिल ठिकाणी अंगणवाडी इमारती बांधकाम करणेबाबत महिला व बाल कल्याण समितीने ठराव क्र. २० दि. १५/०६/२०२६ नुसार मा.महासभेकडे शिफारस करणेत आली आहे.

१) प्रभाग क्र. ५ मधील स्वामी कारखाना चौक
२) प्रभाग क्र.४, केटकाळे नगर, पंचमुखी हनुमान मंदिर शेजारी
३) गुरूकन्ननगर, गल्ली क्र ४
४) कलानगर मारूती मंदिर
५) जिव्हेश्वर मंदिर, भोनेमाळ
६) गणेश गल्ली क्र. ३ गणेशनगर
७) गणेशनगर गल्ली क्र.४ आरोमा बेकरी जवळ
८) करांडे मळा
९) दत्तनगर भाटले मळा स्टाईलअप टेलर जवळ
१०) दत्तनगर भाटले मळा
११) विक्रम नगर फुटाने दवाखाना समोर
१२) आसरा नगर

तरी महिला व बाल कल्याण समितीने केले शिफारशीनुसार वरील नमुद ठिकाणी अंगणवाडी इमारती बांधकाम करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : Satish स. व. मुळीक

अनुमोदक : अ. र. वाळवेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १६४
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. ११ : इचलकरंजी महानगरपलिका क्षेत्रातील महिला व युवतींसाठी अत्याधुनिक स्वच्छतागृह व हिरकणी कक्ष उभारणी बाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. २१ दि. १५/०६/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस..

**ठराव**

इचलकरंजी शहरातील महिला व युवतींच्या आरोग्य, स्वच्छता व सन्मानाच्या दृष्टीने सुरक्षित सार्वजनिक हिरकणी कक्ष व स्वच्छतागृहांची आवश्यकता आहे व स्वतंत्र व गोपनीय जागा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, महिला सुरक्षा व सुविधा वाढविणे ही महानगरपालिकेची सामाजिक जबाबदारी आहे शहर स्वच्छता अभियान व "स्वच्छ भारत मिशन" अंतर्गत मूलभूत सुविधा बळकट होण्यास मदत होईल.

यासाठी इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील महिला व युवतींसाठी खालिल ठिकाणी अत्याधुनिक सार्वजनिक स्वच्छतागृह व "हिरकणी कक्ष" उभारणे बाबत महिला व बाल कल्याण समितीने ठराव क्र. २१ दि. १५/०६/२०२६ नुसार मा.महासभेकडे शिफारस करणेत आली आहे.

१) विकली मार्केट
२) थोरात चौक मार्केट
३) आण्णा रामगोंडा शाळा मार्केट परिसर
४) इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील सर्व उद्याने

तरी महिला व बाल कल्याण समितीने केले शिफारशीनुसार वरील नमुद ठिकाणी अत्याधुनिक सार्वजनिक स्वच्छतागृह व "हिरकणी कक्ष" उभारणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : Satish सौ. व. मुळीक

अनुमोदक : A.P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९६५
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. १२ : इचलकरंजी शहरातील अंगणवाडी विद्यार्थ्यांकरीता बौद्धिक विकास किट (IntellectualDevelopment Kit) मॉडेल पुरविणेबाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. २२ दि. १५/०६/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील अंगणवाडी केंद्रांमध्ये शिक्षण घेत असलेल्या बालकांच्या सर्वांगीण व बौद्धिक विकासासाठी आधुनिक शैक्षणिक साधनांचा वापर करणे आवश्यक आहे बालकांच्या लहान वयात बौद्धिक क्षमता, निरीक्षणशक्ती, स्मरणशक्ती, सर्जनशीलता व भाषिक कौशल्य विकसित होण्यासाठी "बौद्धिक विकास किट" उपलब्ध करून देणे उपयुक्त ठरणार आहे.

सदर कीट मध्ये शैक्षणिक खेळणी, चित्रफलक, अंक व अक्षर ओळख साहित्य, कोडी ( puzzles), रंगसंगती साहित्य इत्यादींचा समावेश असलेले बौद्धिक विकास कीट देणे आवश्यक आहे. तसेच अंगणवाडीची पट कमी असेल तर एक कीट अन्यथा पट संख्या जास्त असेल तर अशा अंगणवाडीला दोन कीट देता येईल .

बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय नागरी प्रकल्प कोल्हापूर - इचलकरंजी अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका कार्यक्षेत्रात १३३ अंगणवाडी केंद्रे असून या अंगणवाडीमध्ये २९९९ मुले पूर्व प्राथमिक लाभ घेत आहेत (माहे मे २०२६ MPR नुसार) त्यानुसार इचलकरंजी शहरातील अंगणवाडी विद्यार्थ्यांकरीता खालिलप्रमाणे बौद्धिक विकास किट (Intellectual Development Kit) पुरविणेबाबत महिला व बाल कल्याण समितीने ठराव क्र. २२ दि. १५/०६/२०२६ नुसार मा.महासभेकडे शिफारस करणेत आली आहे.

| अंगणवाडी संख्या | कीट संख्या | अंदाजे किंमत | एकूण अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| १३३ | २०० | २०,०००/- | ४०,००,०००/- |

तरी महिला व बाल कल्याण समितीने केले शिफारशीनुसार वरील प्रमाणे १३३ अंगाणवाड्यांसाठी बौद्धिक विकास किट (Intellectual Development Kit) पुरविणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : Satish स.व. मुळीक

अनुमोदक : A.P. Bachate अ.प्र. बचाटे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९६६
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. १३ : इचलकरंजी शहरातील विविध उद्यानात खेळणी व ओपन जिम साहित्या बसविणे बाबत महिला व बालकल्याण समिती ठराव क्र. २३ दि. १५/०६/२०२६ नुसार करणेत आलेली शिफारस.

**ठराव**

इचलकरंजी शहरातील विविध परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिक व लहान मुले वास्तव्यास आहेत सदर परिसरातील उद्यानामध्ये नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी तसेच लहान मुलांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांकडून व वारंवार मागणी करण्यात येत आहे.

सदर उद्यानामध्ये लहान मुलांसाठी आधुनिक अशी खेळणी व ओपन जिमची सुविधा उपलब्ध करून देणे बाबत खालीलप्रमाणे शासन निर्णयानुसार ओपन जिमची सुविधा उपलब्ध करून देणे बाबत महिला व बाल कल्याण समितीने ठराव क्र. २३ दि. १५/०६/२०२६ नुसार मा.महासभेकडे शिफारस करणेत आली आहे.

तरी खालील नमूद ठिकाणी ओपन जिमची सुविधा उपलब्ध करून देणेस मंजुरी देणेत येत आहे.

१) व्यंकटेश कॉलनी
२) भारत माता हौ. सोसायटी
३) अष्टविनायक नगर
४) माऊली उद्यान
५) पंडीत जवाहरलाल नेहरु उद्यान
६) छत्रपती संभाजी राजे उद्यान
७) संत ज्ञानेश्वर उद्यान (श्रीपाद नगर)
८) नरवीर तानाजी मालुसरे उद्यान (ढवळे हॉस्पिटल मागे)

सूचक : वि. दु. चोपडे

अनुमोदक : सु. बी. कळागते.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६ | ठराव क्र. १६७
सर्वसाधारण सभा | दि. २०/०७/२०२६

विषय क्र. १४: जवाहर नगर भागातील पोष्ट ऑफीसला लागुन असलेल्या महानगरपालिकेच्या खोल्यांमध्ये अभ्यासिका / वाचनालय सुरु करणेबाबत मा. सतिश वसंतराव मुळीक, सभापती, स्थायी समिती यांनी व महानगरपालिकेच्या प्रत्येक झोन मध्ये नवीन वाचनालय सुरु करणेबाबत मा. प्रदीप नामदेव धुत्रे, सदस्य यांनी मागणी केलेकामी कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका स्थायी समिती सभापती श्री. सतीश वसंतराव मुळीक यांनी दि. १६/०४/२०२६ चे पत्रान्वये जवाहरनगर भागातील पोस्ट ऑफिसला लागून असलेल्या महानगरपालिकेच्या खोल्यांमध्ये अभ्यासिका / वाचनालय सुरु करणेबाबत विनंती केली आहे आणि नगरसेवक श्री. प्रदीप नामदेव धुत्रे यांनी दि. ०४/०५/२०२६ च्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या प्रत्येक झोनमध्ये नवीन वाचनालय सुरु करणेबाबत धोरणात्मक निर्णय व्हावा अशी विनंती केली आहे.

स्थायी समिती सभापती श्री. सतीश वसंतराव मुळीक यांनी प्रभाग क्र. ५ मधील जवाहरनगर परीसरामध्ये पोस्ट ऑफिस शेजारी महानगरपालिकेच्या मालकीच्या खोल्या उपलब्ध आहेत सदर परिसरामध्ये विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून त्यांच्यासाठी अभ्यासाकरिता पोषक वातावरण उपलब्ध झाल्यास स्पर्धा परीक्षा, शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठी मदत होईल, परिसरामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास मदत मिळेल, समाजामध्ये वाचन संस्कृतीला प्रेरणा मिळेल, युवकांना सकारात्मक व विधायक उपक्रमांकडे वळविण्यास मदत होईल आणि महानगरपालिकेच्या उपलब्ध मालमत्तेचा योग्य व सार्वजनिक हितासाठी उपयोग होईल असे नमूद केले आहे.

तसेच नगरसेवक श्री. प्रदीप नामदेव धुत्रे यांनी गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय हे अत्यंत चांगल्या पद्धतीने सुरु असून वाचनालयाचा उपयोग शहरातील गरजू व हुशार विद्यार्थ्यांना होतो. गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालयाच्या धर्तीवर नवीन वाचनालय सुरु करणेत यावे याबाबत धोरणात्मक निर्णय व्हावा असे नमूद केले आहे.

तथापि अभ्यासिका व वाचनालय चालू करणेकरिता पायाभूत सुविधा, पुरेसे मनुष्यबळ, अभ्यासिकेकरिता आवश्यक फर्निचर आणि पुस्तके असणे आवश्यक असून याकरिता वाचनालय विभागाचे लेखाशिर्षावरील सन २०२६-२०२७ सालातील उपलब्ध बजेटमधून सदरकामी खर्च करणे शक्य नाही.

इचलकरंजी महानगरपालिकेचे गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय सध्या महापालिकेच्या मंगलधाम कार्यालय या इमारतीत सर्व- सोयीनियुक्त चालू असून अभ्यासिकेकरिता वर्षाला ९०० च्या आसपास विद्यार्थी / विद्यार्थिनी प्रवेश घेतात. दररोज ३०० ते ३५० विद्यार्थी / विद्यार्थिनी अभ्यासाकरिता येतात. अभ्यासिकेत पुरेशी बैठक व्यवस्था आहे. अभ्यासाकरिता इचलकरंजी व आसपासच्या गावातील विद्यार्थी येतात. वाचनालयाच्या नवीन भव्य इमारतीचे बांधकाम चालू आहे या नवीन इमारतीमधील अभ्यासिकेची क्षमता आणखी वाढविणेत आली आहे. सदर इमारत शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असून शहरातील सर्वच विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता सोयीचे ठरणार आहे.

नविन अभ्यासिका व वाचनालय सुरु करणेकरिता गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय विभागाकडे सन २०२६-२७ सालाकरिता लेखा शिर्षावर बजेट तरतूद नसलेने आणि अभ्यासिकेची वेळ पहाटे ६ ते रात्री १० वाजेपर्यंत असलेमुळे स्टाफ ही महत्वाची बाब आहे स्टाफअभावी अभ्यासिका व वाचनालय चालू करता येणार नाही असा कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी जवाहर नगर भागातील पोष्ट ऑफीसला लागुन असलेल्या महानगरपालिकेच्या खोल्यांमध्ये मा. सतिश वसंतराव मुळीक, सभापती, स्थायी समिती यांचे मागणीनुसार अभ्यासिका / वाचनालय सुरु करणेस व मा. प्रदीप नामदेव धुत्रे, सदस्य यांचे मागणीप्रमाणे महानगरपालिकेच्या प्रत्येक झोन मध्ये नवीन वाचनालय सुरु करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : (सही) सु.बा. कळगते. | अनुमोदक : (सही) वि. पुं. चोपडे.

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. 9६८
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. १५ : आसरा नगर साईट नं. १०२ येथे रमाई आवास योजना घरकुलांना विद्युत व्यवस्था करुन दणेबाबत मा. उदयसिंग मारुती पाटील, विरोधीपक्षनेता यांनी मागणी केलेबाबत.

**ठराव**

मा.श्री.उदय राजश्री मारुती पाटील विरोधी पक्ष नेता यांनी दि.०२/०७/२०२६ व दि.०३/०७/२०२६ रोजीचे पत्रान्वये आसरा नगर साईट नं. १०२ येथे रमाई आवास योजना घरकुलांना विद्युत व्यवस्था करणेबाबत सुचविले आहे.

याकामी कार्यालयाने र.रु.२४,९६,६७५/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केले असून जिल्हा वार्षिक योजना. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेमधून प्रस्ताव सादर करुन निधी उपलब्ध झालेस सदरचे काम हाती घेणे येईल यासाठी सदर कामी निधी उपलब्धतेसाठी सदरचे काम म.न.प.स्वनिधी अथवा जिल्हा नियोजन वार्षिक योजनेतून हाती घेणेस धोरणात्मक निर्णय होणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी आसरा नगर साईट नं. १०२ येथे रमाई आवास योजना घरकुलांना विद्युत व्यवस्था करुन देणेसाठी निधी उपलब्धतेकामी प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : वि. पुं. चोपडे

अनुमोदक : A. P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. १८८
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. १६ : राजर्षी छत्रपती शाहु महाराज पुतळा चौकामध्ये असणारे पी. एम. श्री. एम. एस. बी. उर्दु प्राथमिक शाळा क्र. ४६ इमारतीच्या पुर्व बाजुस असणारी शौचालय इमारत जीर्ण झाली असलेने सदरची शौचालय इमारत निर्लेखीत करणेबाबत मा. विद्या मनोज साळुंखे, सभापती, शिक्षण समिती यांनी मागणी केलेबाबत कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

**ठराव**

राजर्षी छत्रपती शाहु महाराज पुतळा चौकामध्ये असणारे पी. एम. श्री. एम. एस. बी. उर्दु प्राथमिक शाळा क्र. ४६ इमारतीच्या पुर्व बाजुस असणारी शौचालय इमारत जीर्ण झाली असलेने सदरची शौचालय इमारत निर्लेखीत करणेबाबत मा.सौ.विद्या मनोज साळुंखे, सभापती, शिक्षण समिती, यांनी मागणी केलेली आहे.

याबाबत मानसेवी शाखा अभियंता यांनी समक्ष जागेची स्थळपाहणी करून अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये इचलकरंजी महानगरपालिका मालकीची राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुतळा चौकामध्ये असणारी पी.एम. श्री. एम. एस. बी उर्दू हायस्कूल प्राथमिक शाळा क्रमांक ४६ इमारतीच्या पूर्व बाजूस शाळेसाठी पूर्वी बांधण्यात आलेली शौचालयाची इमारत आहे. सदरची इमारत वीट बांधकाम व त्यावरती स्लॅब अशी आहे. सद्यस्थितीत सदरची इमारत जीर्ण झाल्याने धोकादायक स्थितीत असलेचे नमूद केले आहे.

अहवालामध्ये शौचालयाची इमारत जीर्ण झाली असून सद्यस्थितीला धोकादायक स्थितीत असल्यामुळे वापरण्यास अयोग्य आहे असे नमुद असलेने सदरचे शौचालय निर्लेखित करणे आवश्यक असलेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी राजर्षी छत्रपती शाहु महाराज पुतळा चौकामध्ये असणारे पी. एम. श्री. एम. एस. बी. उर्दु प्राथमिक शाळा क्र. ४६ इमारतीच्या पुर्व बाजुस असणारी शौचालय इमारत जीर्ण झाली असलेने सदरची शौचालय इमारत निर्लेखीत करणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : वि. पुं. चोपडे

अनुमोदक : A. P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९७०
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. १७ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दितील चिकन, मटन, मासे विक्री व्यवसाय करणाऱ्यांना देणेत येणाऱ्या व्यवसाय परवाना व आरोग्य विषयक परवाना फी मध्ये वाढ करणेबाबत व नेहरु नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, साईट नं. १०२ व रेणुका नगर या ठिकाणी मटन / चिकन दुकाणे आढळुन येत असुन या ठिकाणी महापालिकेकडुन विक्रेत्यांना परवाना देणेत आलेला नाही. सदर ठिकाणी परवाना दयावयाचा झालेस मा. महासभेमध्ये निर्णय होणेबाबत कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

**ठराव**

तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. १०, दि. २६/०२/२०१५ नुसार चिकन, मटण (बकरी / मेंढी ) व मासे विक्री व्यवसायासाठी व्यवसाय परवाना शुल्क व आरोग्य विषयक शुल्क प्रत्येकी रु. ७५०/- निश्चित करण्यात आलेले होते. आरोग्य विषयक शुल्क आरोग्य विभागामार्फत वसूल करण्यात येते. सदर शुल्कामध्ये मागील अनेक वर्षापासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका औद्योगिक नगरी अधिनियम, १९४९ मधील प्रकरण १९ मधील कलम ३३२ नुसार नगरपालिका बाजार, कत्तलखाने व पशु - आवार यांवरील दुकान - भाडे, भाडे व फी आकारण्याचा अधिकार स्थायी समितीस / महापालिकेस प्रदान करण्यात आलेला आहे. तसेच बाजार व कत्तलखान्यांचे व्यवस्थापन, देखभाल, स्वच्छता, निर्जंतुकीकरण , घनकचरा व्यवस्थापन , पाणीपुरवठा , वीज व प्रशासकीय खर्चामध्ये सातत्याने वाढ होत असल्याने विद्यमान शुल्क दर अपुरे ठरत आहेत.

सध्या आकारण्यात येत असलेले शुल्क दर सन २०१५ पासून लागू असून गेल्या १० वर्षांमध्ये महागाई निर्देशांक, वेतन, देखभाल व प्रशासकीय खर्चामध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे सदर परवाना शुल्कामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ३२८ नुसार महानगरपालिकेस बाजार, कत्तलखाने व पशु-आवार स्थापन व त्यांचे नियमन करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच कलम ३३२ नुसार महानगरपालिका बाजार, कत्तलखाने व पशु-आवार यांमधील दुकाने, गाळे, जागा, भाडे व फी याबाबत स्थायी समितीमार्फत वेळोवेळी शुल्क निश्चित व आकारणी करण्याची तरतूद आहे.

सध्यस्थितीत तात्कालीन इचलकरंजी नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. १०, दि. २६/०२/२०१५ नुसार परवाना शुल्क प्रत्येक दुकानदार/ विक्रेत्याकडून वार्षिक परवाना व नूतनीकरण शुल्क रक्कम रु. ७५०/- इतके घेण्यात येत आहेत. साध्यस्थितीत आकारण्यात येत असलेली वार्षिक परवाना फी अत्यंत कमी असून त्यामध्ये (२०% मटन) (१०% चिकन) वाढ होणे आवश्यक असलेबाबत तसेच इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमध्ये नेहरू नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, साईट नं.१०२, रेणुका नगर या ठिकाणी मटण / चिकन दुकाने आढळून येत आहेत. परंतु महापालिकेकडून विक्रेत्यांना कोणताही परवाना देण्यात आलेला नाही. या बाबत नियम व अटी अनुसरून परवाना द्यावयाचे झालेस धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे असा कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका हद्दितील चिकन, मटन, मासे विक्री व्यवसाय करणाऱ्यांना देणेत येणाऱ्या व्यवसाय परवाना व आरोग्य विषयक परवाना फी प्रस्तावात नमुदप्रमाणे वाढ करणेस व नेहरु नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, साईट नं. १०२ व रेणुका नगर या ठिकाणी असणा-या मटन / चिकन विक्रेत्यांना महानगरपालिका नियम व अटी नुसार परवाना देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : वि. पु. चोपडे

अनुमोदक : O.R. Surve
ओ. ए. सुर्वे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०६
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ९७७
दि. २०/०७/२०२६

विषय क्र. १८ : ऑल इंडीया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट या संस्थेच्या नियामक मंडळ निवडणुकीसाठी निर्वाचन गण गठीत करणेकरीता महानगरपालिकेमध्ये निवडुन आलेल्या दोन विद्यमान प्रतिनिधींची नावे पाठविणेबाबत कार्यालयाकडून आलेला प्रस्ताव.

## ठराव

ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट या संस्थेच्या नियामक मंडळ निवडणुकीसाठी निर्वाचन गण गठित करण्याच्या अनुषंगाने महापालिकेमधुन निवडून आलेल्या विद्यमान दोन (२) नगरसेवकांची नावे तसेच संबंधित ठरावाची प्रमाणित प्रत पाठविण्याबाबत संदर्भाधीन परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

सदर बाबीचा विचार करून प्रतिनिधींची नावे, संपूर्ण पत्ता व संबंधित ठरावाची प्रमाणित प्रत प्राप्त होण्याची अंतिम दिनांक २७जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यत देणेत आली आहे.

त्याअनुषंगाने इचलकरंजी महानगरपालिकेच्या वतीने निवडून आलेल्या विद्यमान दोन (२) नगरसेवकांची नावे, ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांना पाठविणेकामी निवडुन आलेल्या दोन सदस्यांची नावे मा. महासभेमध्ये निश्चित करणे व सदर नावांचा ठराव होणेकामी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी ऑल इंडीया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट या संस्थेच्या नियामक मंडळ निवडणुकीसाठी निर्वाचन गण गठीत करणेकरीता महानगरपालिकेमध्ये निवडुन आलेल्या खालिल दोन विद्यमान प्रतिनिधींची नावे पाठविणेत यावीत.

१. सुशांत बाळासाहेब कलागते.
२. मनोज भिमाशंकर हिंगमिरे.

सूचक : वि. पुं. चोपडे

अनुमोदक : स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner